पिंपरी चिंचवड महानगरपालिका
प्राथमिक शिक्षण विभाग
जाक्र.शिवि/आ/१/कावि/४१६/२०२१
दिनांक २७/१० /२०२१

परिपत्रक,

संदर्भ- महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
परिपत्रक क्रमांक:संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१४२/एस.डी.४ दि.२७/१०/२०२१

विषय – दिवाळी सुट्टीबाबत...

कोव्हीड-१९ प्रादूर्भावाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील ग्रामिण व शहरी भागातील शाळा दिनांक ०४/१०/२०२१ पासून ऑफलाईन स्वरुपात सुरु झालेल्या आहेत. राज्यातील इ. १ ली ते १२ वी च्या शाळांना विविध धार्मिक सण/उत्सवांकरीता सुट्टया घोषित करण्यात येत असतात.

उपरोक्त संदर्भीयान्वये सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षामध्ये दिवाळी सणाच्या अनुषंगाने राज्यातील शाळांना दि. २८ ऑक्टोंबर २०२१ ते १० नोव्हेंबर २०२१ या कालावधीकरीता सुट्टी घोषित करण्यात आलेली आहे. या कालावधीत शाळांमार्फत घेण्यात येणारे ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने सुरु असलेले अध्यापनाचे कामकाज बंद राहिल, असे नमुद केलेले आहे.

त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागांतर्गत सर्व मनपा व खाजगी शाळांना दि. २८ ऑक्टोंबर २०२१ ते १० नोव्हेंबर २०२१ अखेर दिवाळीची सुट्टी जाहीर करणेत येत आहे. सदरचे परिपत्रक आपले अधिपत्याखालील कार्यरत सर्व शिक्षक, अध्यापक व कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देणेत यावे तसेच दिनांक ११ नोव्हेंबर २०२१ पासून शाळा पूर्ववत सुरु राहील याची स्पष्ट नोंद घ्यावी.

(स्मिता गौड)
प्रशासन अधिकारी
प्राथमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रति,

सर्व मुख्याध्यापक,
मनपा व खाजगी प्राथमिक शाळा.